accelya

# ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड

**सीआयएन :** एल७४१४०पीएन१९८६पीएलसी०४१०३३
**नोंदणीकृत कार्यालय :** ५ वा आणि ६ वा मजला, बिल्डींग नं. ४, रहेजा वूड्स, रिव्हर साईड २५ए, वेस्ट ॲव्हेन्यू, कल्याणीनगर, पुणे ४११ ००६ **फोन :** +९१ २० ६६०८३७७७
**ई-मेल:** accelyaindia.investors@accelya.com **संकेतस्थळ :** w3.accelya.com

## ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, रेकॉर्ड तारीख आणि ई-मतदानाची माहिती

सूचना देण्यात येत आहे की, ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड (''द कंपनी'') च्या सभासदांची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') **गुरुवार, १७ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता** सुमंत मूळगावकर सभागृह, 'ए विंग' तळमजला, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, ट्रेड टॉवर, आयसीसी कॉम्प्लेक्स, ४०३, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६ येथे होणार आहे. या एजीएम मध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवाला सोबत पाठवलेल्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार व्यवसाय व्यवहार केले जातील. एजीएमची सदर सूचना आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल हा अशा सभासदांना इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे पाठवला गेला आहे ज्यांचे ईमेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट किंवा केफिन टेक्नॉलॉजीज् लिमिटेड (''केफिनटेक'') कडे नोंदणीकृत आहेत. उपरोक्त कागदपत्रे छापील स्वरुपात प्राप्त करू इच्छिणाऱ्या सभासदांनी कंपनीकडे विनंती करावी. वार्षिक अहवालासह सूचना कंपनीची वेबसाइट https://w3.accelya.com/investors/ वर , स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर म्हणजे बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर आणि केफिनटेक च्या www.kfintech.com वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

**रेकॉर्ड तारीख**

कंपनी कायदा, २०१३ (''द ॲक्ट'') च्या कलम ९१ आणि लिस्टिंग रेग्युलेशन च्या नियमन ४२ च्या तरतुदींनुसार, २०२३-२४ आर्थिक वर्षासाठी अंतिम लाभांश प्राप्त करण्यासाठी पात्र सभासद निश्चित करण्याच्या उद्देशाने शुक्रवार, ४ ऑक्टोबर, २०२४ ही तारीख कंपनीने रेकॉर्ड तारीख म्हणून निश्चित केली आहे .

संचालक मंडळाने २०२३-२४ आर्थिक वर्षासाठी रु. ४० प्रति सममाग इतक्या अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे, जी आगामी एजीएममधील सभासदांच्या मान्यतेच्या अधीन असेल. समभागावरील लाभांश, एजीएममध्ये घोषित झाल्यास २९ ऑक्टोबर, २०२४ रोजी खालीलप्रमाणे जमा केला / पाठविला जाईल:

अ) शुक्रवार, ४ ऑक्टोबर, २०२४ रोजी बंद होण्याच्या वेळेला केफिनटेकला कंपनीने पुरवलेल्या तपशिलानुसार ज्या समभागधारकांनी प्रत्यक्ष स्वरुपात समभाग धारण केले आहेत आणि

ब) इलेक्ट्रॉनिक स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या लाभार्थी मालकांना, एनएसडीएल आणि सीडीएसएल यांनी कंपनीला शुक्रवार, ४ ऑक्टोबर, २०२४ रोजी कामकाज बंद होण्याच्या वेळेच्या प्रदान केलेल्या लाभार्थी मालकांच्या तपशीलानुसार

सभासदांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे पॅन, संपर्क तपशील, बँक खात्याचे तपशील, नमुना स्वाक्षरी (लागू असेल तसे) डीमटेरियलाईज्ड स्वरुपात ठेवल्यास किंवा केफिनटेक कडे (फॉर्म ISR-1, ISR-2 द्वारे) प्रत्यक्ष स्वरुपात असल्यास सादर करा. सदर फॉर्म https://ris.kfintech.com/clientservices/isc/default.aspx#isc_download_hrd वर उपलब्ध आहेत .

**लाभांशावरील स्रोतावर कर वजावट (टीडीएस).**

जाहीर केलेला लाभांश हा लागू दरांवर स्रोतावरील कर वजावटीच्या अधीन राहून भागधारकांच्या हातात करपात्र असेल.

कंपनीच्या ज्या सभासदांनी त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत केला आहे अशा सभासदांना तपशीलवार प्रक्रिया आणि घोषणेचे स्वरूप स्वतंत्रपणे पाठवले जाईल.

**ई-मतदान**

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ ('नियम') सुधारीत च्या नियम २० सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १०८ नुसार आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ (''सेबी रेग्युलेशन्स'') च्या विनियम ४४ अन्वये कंपनीला तिच्या सभासदांना ई-मतदानाची सुविधा देताना आनंद होत आहे. कंपनीने ई-मतदानाची सुविधा देण्यासाठी केफिनटेक च्या ई-मतदान प्लॅटफॉर्मच्या सेवा घेतल्या आहेत.

**एजीएममध्ये दूरस्थ ई-मतदान आणि ई-मतदानासाठी सूचना**

सोमवार १४ ऑक्टोबर, २०२४ (सकाळी ९.००) पासून बुधवार, १६ ऑक्टोबर २०२४ (सायंकाळी ५.००) पर्यंत सभासद ऑनलाईन पध्दतीने मतदान करू शकतात. या तारखेच्या पुढे मतदानाला परवानगी दिली जाणार नाही आणि दूरस्थ ई-मतदान सुविधा बंद केली जाईल.

ज्या सभासदांचे नाव सदस्य नोंदणी आणि लाभार्थी मालक नोंदणीमध्ये डिपॉझिटरीद्वारे ज्यांची नोंद केली आहे, ज्याची कट ऑफ तारीख गुरुवार, १० ऑक्टोबर, २०२४ आहे फक्त अशा सभासदांनाच केफिनटेक द्वारे https://evoting.kfintech.com या बेवसाईटवर दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. ई-मतदानासाठी तपशीलवार प्रक्रिया/सूचना ३८ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये दिल्या आहे.

**ई-मतदानाशी संबंधित शंका/तक्रारी**

कोणत्याही शंका/तक्रारींच्या बाबतीत, आपण https://evoting.kfintech.com च्या 'Download' विभागात सभासदांसाठी उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता किंवा १८००-३०९-४००१ या टोल फ्री नंबरवर केफिनटेक ला कॉल करू शकता.

**ॲक्सेलिया सोल्युशन्स इंडिया लिमिटेड साठी**

**निनाद उमराणीकर**
कंपनी सचिव
सभासदत्त्व क्र. ACS14201

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** २० सप्टेंबर, २०२४